




Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com



वर्ष ३ रे    अंक : २७१ वा    सोमवार   दि. ३० डिसेंबर २०२४    पृष्ठ ८    किंमत ३रुपये


# तलाठी-मंडळ अधिकारी महासंघ भ्रष्टाचाऱ्यांचा अड्डा झालाय का?

## भ्रष्टाचाऱ्यांना वरिष्ठ पदांवर नियुक्ती महासंघाच्या कोणत्या तत्वात बसते?

**जनसंचलन/बुलढाणा**

महसूल विभागात काम करताना तलाठी, मंडळ अधिकारी यांची महत्वाची भूमिका असते. कारण ग्राऊंड लेव्हलवर हे अधिकारी-कर्मचारी काम करीत असतात. त्यामुळे त्यांची नाळ थेट जनतेशी जुळलेली असते. पर्यायाने या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे काम करणे गरजेचे आहे. परंतु बुलढाणा महसूल विभागातील एक मंडळ अधिकारी गेल्या वर्षानुवर्षांपासून नियमबाह्य बेबंदपणे भ्रष्टाचार करतो, आपल्याच शासनाच्या महसुलाचे नुकसान करतो, जनतेची लुबाडणूक करतो, भ्रष्टाचारातून बेनामी संपत्ती गोळा करतो, तरीही त्याला या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या संघटनेत बढती दिली जाते, हे प्रचंड आश्चर्यकारक आहे. त्यामुळे सध्या राज्याच्या तलाठी-मंडळ अधिकारी महासंघ हा भ्रष्टाचाऱ्यांचा अड्डा बनला की काय, असा प्रश्न उपस्थित होतो.वरील सर्व तपशील लिहिण्याचे मुख्य कारण म्हणजे बुलढाणा महसूल विभागातील भ्रष्टाचाराचे शिरोमणी आणि ज्यांनी भ्रष्टाचारात मोठमोठे विक्रम प्रस्थापित केले अशा विजय दत्तात्रय टेकाळे यांची तलाठी-मंडळ अधिकारी महासंघाच्या राज्य अध्यक्षपदी नियुक्ती होण्याचे आहे. काही दिवसांपूर्वी या महासंघाची एक बैठक पार पडली. राज्यातील विविध विभागांमध्ये ज्या तलाठी-मंडळ अधिकारी संघटना आ-हेत, त्यांचा समन्वय साधण्याचे काम हा महासंघ करतो. तलाठी, मंडळ अधिकाऱ्यांच्या सेवेदरम्यान ज्या काही मागण्या असतात, त्या मागण्या शासनासोबत तडजोड करून सोडवणे हे या महासंघाचे मुख्य काम आहे. खरे तर या महासंघाच्या कामकाजात कुठेही भ्रष्टाचाराला थारा असण्याचे कारण नाही. यापूर्वी कधीही सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनने या महासंघावर प्रश्नचिन्हे उपस्थित केले नाही. परंतु आता प्रश्नचिन्हे उपस्थित करण्याचे कारण तेवढेच प्रबळ असे आहे. अगदी बेशरमपणे, नालायकपणे भ्रष्टाचार करणारे विजय दत्तात्रय टेकाळे हे या महासंघाच्या अध्यक्षपदी निवडले गेले आहेत. खरेतर ज्या मान्यवरांनी टेकाळे यांची नियुक्ती केली, ते देखील महसूल विभागाचाच एक भाग आहेत. वर्षानुवर्षे त्यांचा टेकाळे यांच्याशी संबंध असण्याचीही दाट शक्यता आहे. या स्थितीतही टेकाळेंची नियुक्ती ही कोणत्या कारणांनी करण्यात आली, हा मोठा प्रश्न आहे. टेकाळे यांनी आपल्या गेल्या २०-२५ वर्षांच्या शासकीय सेवाकाळात अनेक मोठमोठे प्रताप केलेले आहेत. टेकाळे यांनी बुलढाणा महसूल विभागाला भ्रष्टाचाराची गटारगंगा बनवून टाकले आहे. टेकाळे यांनी आयुष्यात भ्रष्टाचार करण्याची एकही संधी सोडलेली नाही. खरेतर टेकाळेंकडे एव्हढा बेशरमपणा, एव्हढा नालायकपणा येतो कुठून हाच प्रश्न महसूल विभागातील अनेकांना पडलेला आहे.विजय टेकाळे यांनी अत्यंत वेगवेगळ्या पातळ्यांवर भ्रष्टाचार करून शेकडो-हजारो नागरिकांची लुबाडणूक केली आहे. अनेकांना त्यांच्या संपत्तीचे अधिकार या नालायक माणसामुळे मिळालेले नाहीत. ज्या शासनाचा पगार खातात, त्याच शासनाच्या तुकडेबंदी कायद्यांचे, महसूल अधिनियमांचे, वारसा हक्क कायद्यांचे उल्लंघन टेकाळे यांनी केलेले आहे. चक्क एकाची जमीन दुसऱ्याच्या नावावर करण्याचा प्रतापही त्यांनी केलेला आहे. टेकाळे यांच्यावर यापूर्वी फौजदारी स्वरूपाचे गुन्हेदेखील दाखल झालेले आहेत. आपल्याच विभागाच्या अधिकाऱ्यांविषयी अर्वाच्य बोलणे, अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करणे, हे प्रकार टेकाळे सर्रास करीत असतात. ज्या शासनाची नोकरी करतात, त्याच शासनाच्या महसुलाला चुना लावण्याचा बदमाशपणा टेकाळेंनी केलेला आहे. बदमाशी ही टेकाळेंच्या धमन्यांमधून जोरदार वाहत असते. शासकीय सेवाशर्ती नियमांचाही टेकाळेंनी भंग केला आहे. एव्हढे होऊन देखील त्यांच्यावर कारवाई करण्याची हिम्मत ना जिल्हाधिकाऱ्यांमध्ये आहे ना उपविभागीय अधिकाऱ्यांमध्ये महसूलचे अधिकारी देखील टेकाळेंसमोर अगदी लाचार, मजबूर दिसून येतात. हे सगळे काही पाहून आज टेकाळे यांचा माज प्रचंड वाढलेला आहे. त्यामुळे भ्रष्टाचार करताना त्यांना कसलीही लाज, शरम वाटत नाही. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजच्या वतीने गेल्या दोन वर्षांपासून टेकाळेंच्या भ्रष्टाचाराचा भंडाफोड केलेला आहे. टेकाळेंचा हा भ्रष्टाचार आम्ही अक्षरशः उघडा-नागडा केलेला आहे. आज संपूर्ण राज्याच्या महसूल विभागात टेकाळेंच्या भ्रष्टाचाराच्या कहाण्या पोहोचलेल्या आहेत. या स्थितीतही टेकाळेंना तलाठी-मंडळ अधिकारी महासंघाच्या अध्यक्षपदावर नियुक्ती मिळणे हे महासंघात चाललेल्या अनागोंदीचा प्रकार आहे हे दिसून येते. टेकाळेंना हे पद देण्यासाठी कोणी दबाव आणला? टेकाळेंनी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांना ब्लॅकमेल केले की काय? टेकाळेंचे भ्रष्टाचाराचे प्रताप हे महासंघाच्या पदाधिकाऱ्यांना माहिती नव्हते




का? किंवा माहिती असूनही मग नियुक्ती का केली? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. टेकाळेंचे भ्रष्टाचाराची आक्राळविक्राळ रूप हे महासंघाच्या पदाधिकाऱ्यांना माहिती नसण-ार, याची अजिबात शाश्वती नाही. त्यामुळे प्रश्न असा उपस्थित होतो की, महाराष्ट्र राज्य तलाठी-मंडळ अधिकारी महासंघ हा अशा भ्रष्टाचाऱ्यांना पदांवर बढती देत-ो का? तलाठी-मंडळ अधिकारी महासंघ हा भ्रष्टाचाऱ्यांचा अड्डा बनला आहे? या सर्वांची उत्तरे ला महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी देणे गरजेचे आहे.दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज आतापर्यंत केवळ टेकाळेंच्या भ्रष्टाचाराविरोधात लढत होता. आता हा लढा आणखी व्यापक करावा लागणार आहे.आता हा महासंघाच्या या धोरणाविरोधात, महासंघात वरिष्ठ पदांवर बसलेल्या भ्रष्टाचाऱ्यांसोबत देखील लढणार आहे. कारण आम्ही भ्रष्टाचार अजिबात सहन करू शकत नाही. त्यामुळे आगामी काळात आता तलाठी-मंडळ अधिकारी महासंघातील बेबंदशाही व भ्रष्टाचार आम्ही बाहेर काढणार आहोत

अजून बरेच काही पुढील भागात...

# रेती माफियाविरुद्ध धडक कारवाई, दोन टिप्पर जप्त...

**जनसंचलन/बुलढाणा**

खडकपूर्णा नदी पात्रातून रेतीची अवैध वाहतूक करणारे दोन टिप्पर प्रभारी जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, बुलढाणा तहसीलदार विठ्ठल कुमरे यांच्या पथकाने पकडले. त्यापैकी एक टिप्पर देऊळगाव राजा पोलिस स्टेशनमध्ये जमा करण्यात आला, तसेच टिप्पर घेऊन चालक पसार झाला. खडकपूर्णा नदीच्या पात्रातून गत काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात रेतीचे उत्खनन करून अवैध वाहतूक करण्यात येत आहे. प्रभारी जिल्हाधिकारी सदाशिव शेलार व बुलढाणा तहसीलदार कुमरे यांनी २८ डिसेंबर रोजी चिखली रस्त्यावर रेतीची वाहतूक करणारे टिप्पर जप्त केले. त्यानंतर देऊळगाव राजा तालुक्यात चिखलीचे तहसीलदार संतोष काकडे यांच्याबरोबर उत्खनन करण्यात येत असलेल्या ठिकाणावर भेटी दिल्या, तसेच दोन विना क्रमाकांचे टिप्पर जप्त केले. त्यापैकी एक टिप्पर चालकाने पळवून नेले, तर एक टिप्पर पोलिस स्टेशनला लावण्यात आले आहे. या कारवाईमुळे रेती माफियांचे धाबे दणाणले आहेत.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राजूर येथे एकास रॉडने मारहाण...

जनसंचलन/मोताळा

दुचाकीवरून जात असलेल्या एकास जुन्या वादातून लोखंडी रॉड आणी फायटरने मारहाण करून जखमी केल्याची घटना शुक्रवारी २७ डिसेंबर रोजी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास राजूर बस स्टँडवर घडली. या प्रकरणी बोराखेडी पोलिसांनी चार जणांविरोधात गुन्हा दाखल केला. शहरातील प्रभाग क्र. १३ मधील सुभाष माताळे यांनी ही तक्रार दिली. शुक्रवारी त्यांचा पुतण्या ऋषिकेश सुनील माताळे हा मित्रांसह बुलढाणा येथून कपडे खरेदी करून मोताळा येत होता. रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास राजुर येथील बसस्टॅन्डवर मुन्ना चौबे, राजेश चौबे, सौरभ चौबे आणी आदित्य उदयकार (रा. राजूर) या चौघांनी जुन्या वादातून त्यांची दुचाकी थांबवली व ऋषिकेश यास लोखंडी रॉड व फायटरने मारहाण केली. तक्रारीवरून पोलिसांनी मुन्ना चौबे, राजेश चौबे, सौरभ चौबे आणी आदित्य उदयकार यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला.

# संघटनात्मक बांधणीसाठी शिंदेसेनेची सोमवारी बैठक...

जनसंचलन/बुलढाणा

मोताळा व बुलढाणा तालुक्यातील शिंदेसेनेची ३० डिसेंबर रोजी संघटनात्मक बैठक अर्थात मेळावा घेण्यात येणार असून, त्यामध्ये जवळपास ४ हजार कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी काळातील निवडणुकांची तयारी तथा पक्ष संघटन मजबुतीसाठी आ. संजय गायकवाड यांच्या पुढाकारातून ही बैठक आयोजित केली आहे. पक्षाची नव्याने बांधणी, महायुती व निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या मेळाव्याकडे बघितल्या जात आहे. दरम्यान आमचा हा मेळावा आत्मचिंतनासाठी नाही. मेळावा नसून संघटन मजबुतीवर जोर देण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार असल्याचे आ. संजय गायकवाड यांनी सांगितले

# असोला खून प्रकरणात डीएनएच्या रिपोर्टची प्रतीक्षा

जनसंचलन/ अंढेरा

जानेवारी महिन्यात अंढेरा पोलिस ठाण्यांतर्गत असोला शिवारात एका युवतीचा अर्धवट जळालेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला होता. अन्यत्र खून करून तरुणीचा मृतदेह येथे आणून टाकल्याचा पोलिसांचा कयास होता. या प्रकरणात मृत तरुणीची ओळख अद्याप पटलेली नसून, ती मुलीसारखी असल्याचा दावा करणाऱ्या दोन व्यक्तींचा डीएनए तपासणीसाठी अमरावती येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आला आहे. परंतु अद्याप त्याचा अहवाल आलेला नाही. या तरुणीचा खून कोणी व कोणत्या कारणावरून केला, ही बाब अद्यापही स्पष्ट झालेले नाही. चालू वर्षातील दोन खुनाच्या गुन्ह्यांपैकी हे एक आव्हानात्मक प्रकरण असून, अंढेरा पोलिस त्याचा तपास करत आहेत. २३ जानेवारी रोजी चिखली तालुक्यातील असोला शिवारात अनोळखी युवतीचा अर्धवट जळालेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला होता. त्यामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली होती. चिखली- आंचरवाडी रस्त्यावरील एका ढाब्याच्या पाठीमागे हा मृतदेह आढळून आला होता. घटनेची गंभीरता पाहता पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास कार्य सुरू केले होते. या प्रकरणात मृत मुलीची ओळख पटू शकली नाही; मात्र मृत मुलीचे पोलिसांनी दिलेले वर्णन पाहून मेहकर तालुक्यातील एका गावातील दोन जणांनी अंढेरा पोलिस ठाणे गाठून मृत मुलीचे वर्णन हे आमच्या मुलीसारखे असल्याचा दावा केला होता. त्यामुळे पोलिसांनी या दोन्ही व्यक्तींचे डीएनएचे नमुने घेऊन ते मृत मुलीच्या डीएनएशी जुळतात का? याच्या तपासणीसाठी अमरावती येथील प्रयोग शाळेत पाठविलेले आहे. आता जवळास या घटनेला एक वर्ष पूर्ण होत आहे; परंतु अद्याप डीएनएनचा रिपोर्ट आलेला नाही. त्याची पोलिसांना प्रतीक्षा आहे




# त्या आरोपींची कोठडी संपणार

जनसंचलन/बुलढाणा

अतिवृष्टीमधील मदत वाटपामध्ये बनावट लाभार्थी उभे करून १ कोटी ७० लाख रुपयांचा आर्थिक घोटाळा केल्या प्रकरणात अटक तलाठी उमेश बिल्लेवार, अनंता माठे आणि संगणक चालक महादेव पाटील यांना रविवारी आज न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. आर्थिक गुन्हे शाखेने बुधवारी त्यांना अटक केली होती. २९ डिसेंबरपर्यंत त्यांना पोलिस कोठडी सुनावण्यात आली होती.

# देऊळघाट बसस्थानकात बसच्या धडकेत एक जखमी

जनसंचलन/देऊळघाट

तालुक्यातील देऊळघाट येथील बसस्थानकात बसच्या धडकेत एकजण जखमी झाल्याची घटना दि. २८ डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजताच्या सुमारास घडली. शेख वसीम शेख सलीम (वय ३८, रा. देऊळघाट) असे या अपघातामध्ये जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. बुलढाणा आगाराची एमएच-४०-एन-९८१० क्रमांकाची बस ही बुलढाण्यावरून मढ मार्गे धाडला जात होती. यावेळी बसचालक संजय लक्ष्मण पवार (रा. तराडखेड) याने त्याच्या ताब्यातील ही बस भरधाव वेगाने चालवली. तो मद्य प्यालेला होता, अशीही ओरड आहे. भरधाव वेगातील त्या बसने देऊळघाट येथील बसस्थानकाजवळ शेख वसीम शेख सलीम यांना धडक दिली. त्यामुळे ते गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर बुलढाणा येथील खासगी रुग्णालयामध्ये उपचार करण्यात येत आहेत. या अपघाताची माहिती मिळताच बुलढाणा ग्रामीण पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी बसचालक संजय लक्ष्मण पवार (रा. तराडखेडे) यास ताब्यात घेतले आहे. चालक संजय पवार हा मद्य प्यालेला होता, हे स्थानिक नागरिकांच्या लक्षात आले. त्याची माहिती त्यांनी पोलिसांना दिली. दरम्यान, या अपघातप्रकरणी अद्याप बुलढाणा ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

# सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी वेधले लक्ष

जनसंचलन/बिबी

स्थानिक सहकार विद्या मंदिर शाळेत नव संकल्प २०२४ या शाळेच्या दोनदिवसीय वार्षिक स्नेहसंमेलनाला सुरुवात झाली. यादरम्यान आयोजित विविध सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होत विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. बुलढाणा अर्बन सोसायटीचे चीफ मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. सुकेश झंवर यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. ठाणेदार संदीप पाटील, सरपंच चंदाबाई गुलमोहर, उपसरपंच भास्कर खुळे, केंद्रप्रमुख सुनील बोरकर, स्थानिक संचालक पाटीलबा आंधळे, सानप यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ग्रामीण भागात दर्जेदार शिक्षण देण्याचे काम सहकार विद्या मंदिरच्या माध्यमातून होत आहे. तसेच अभ्यासक्रमासोबतच सांस्कृतिक क्रीडा स्पर्धांमध्ये सुद्धा शाळेने नावलौकिक मिळविला आहे. विद्यार्थ्यांनी रीलच्या दुनियेतून बाहेर पडून रियल लाइफ जगणे गरजेचे असल्याचे सुकेश झवर म्हणाले. संदीप पाटील म्हणाले की, कमी वयात विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारचे वाहन चालवू नये, हेल्मेटचा वापर करावा, पालकांनी सुद्धा याबाबत काळजी घेऊन लहान मुलांच्या हाती वाहन देऊ नये, वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध नृत्य, सामाजिक संदेशपर थिम सादर केली. धार्मिक देशभक्तीपर गीतांचे बहारदार सादरीकरण करून क्षकांची मने जिंकली. सूत्रसंचालन पिसे, माळोदे, हरकळ, महाजन, अशोक ढाकणे यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक इंगळे, आर. जी. राठोड आदींनी केले.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# खामगाव-पातुर्डा बस फेरी अनियमित !

जनसंचलन/ संग्रामपूर

खामगाव आगाराची सकाळी नऊ वाजता खामगाव वरून निघणारी खामगाव ते पातुर्डा ही बसफेरी गेल्या अनेक दिवसांपासून अनियमितपणे धावत असल्याने विद्यार्थी, तसेच प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. खामगाव आगार प्रमुख यांनी याकडे लक्ष देण्याची मागणी प्रवासी व विद्यार्थी वर्गातून होत आहे. या भागातून खामगाव येथे जाणारी एकमेव बस आहे. खामगाव ते पातुर्डा सकाळी नऊ वाजताची बसफेरी बऱ्याच वेळा स्थानक प्रमुख पातुर्डा पाठवत नाही. त्यामुळे पातुर्डा येथे शालेय विद्यार्थी, तसेच प्रवाशांना बस न आल्यामुळे खासगी वाहनाने प्रवास करावा लागतो

# सुशासन सप्ताहात ५३०१ लाभार्थ्यांना सेवांचा लाभ !


जनसंचलन/बुलढाणा

केंद्रीय प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागाच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासन मार्फत १९ ते २४ डिसेंबर दरम्यान सुशासन सप्ताह-प्रशासन गाँव की ओर मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेंतर्गत जिल्हा प्रशासनाच्या विविध विभागामार्फत ५,३०१ लाभार्थ्यांना विविध शासकीय सेवांचा लाभ देण्यात आला. या मोहिमेला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून या मोहिमेंतर्गत तालुकास्तरावर व गावस्तरावर एकूण ९१ शिबिरे आयोजित करण्यात आले होते. या मोहिमेंतर्गत लाभार्थ्यांना विविध दाखल्यांचे वितरण करण्यात आले. यात जन्म-मृत्यू दाखला, जात दाखला, उत्पन्न दाखले, संजय गांधी निराधार योजनेचा लाभ इत्यादी लाभाचे वितरण करण्यात आले. या मोहिमेत जिल्हा प्रशासनासह उपविभागीय कार्यालय, तहसील कार्यालय, जिल्हा परिषद, विविध प्रशासकीय विभाग आणि ग्रामपंचायतींनी तालुका व गावस्तरावर शिबिरांचे आयोजन करुन पात्र लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचे लाभ वितरित केले

# अवकाळी पावसामुळे गारठा वाढला!

जनसंचलन/ वरवट बकाल

गेल्या दोन दिवसांपासून संग्रामपूर तालुक्यात ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने गार वाऱ्यासह थंडीचा जोर वाढला आहे. शुक्रवारी रोजी पहाटे अवकाळी पावसाने हजेरी लावली असता तालुक्यात गारठा निर्माण झाला असून, रात्रीच्या तापमानात घट झाली आहे. हवामान खात्याने दिलेल्या निर्देशानुसार गत दोन दिवसांपासून संग्रामपूर तालुक्यात ढगाळ वातावरण आहे. अशातच शुक्रवारी अवकाळी पावसाने हजेरी लावली असता बाजारपेठेत फारशी गर्दी दिसली नाही.




# मूल्यशिक्षण हेच संस्कारचे उत्तम माध्यम !...

जनसंचलन/मेहकर

बालमनावर संत साहित्यातील मूल्य शिक्षणाचा संस्कार करणे काळाची गरज बनले आहे. मूल्य शिक्षणातूनच प्रामाणिक आणि सदाचारी माणूस घडत असतो. कुटुंब आणि समाज व्यवस्थेतील आटत चाललेला आपुलकी आणि जिव्हाळा टिकून ठेवण्यासाठी मूल्य शिक्षण अत्यंत आवश्यक बनले आहे. देशाच्या विकासात व्यक्तीच्या बौद्धिक विकासाबरोबरच भावनिक आणि आध्यात्मिक विकासाची महत्वाची भूमिका असते. त्यासाठी संतसाहित्य हे मूल्य शिक्षणाचे भांडारच आहे, असे प्रतिपादन हिवरा आश्रम येथील प्रा. डॉ. ज्ञानेश्वर गाडे यांनी शुक्रवारी बोलताना व्यक्त केले. जानेफळ येथिल श्री. सरस्वती कला व विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयोच्या शिबिरातील बौद्धिक सत्रात संत साहित्यातील मूल्य शिक्षण संस्काराचे उत्तम माध्यम या विषयावर ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी किरण चांदणे होत्या. भास्कर चांदणे, पोलिस पाटील नरेश चांदणे, मीनल जोहरे, कल्पना फिरके, प्रा. गोरेगावकर, सचिन वाघमारे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. रमेश नालेगावकर यांनी केले. पुढे ते म्हणाले की, लहान मुलांना संस्काराच्या गोष्टी सांगणाऱ्या आजी व आजोबांची जागा आज मोबाइल आणि टीव्हीवरील कार्टून व गेमने घेतली आहे. त्यामुळे प्रत्येक कुटुंब संकटात सापडले आहे. त्यामुळे आज संत साहित्यातील संस्कार कथाप्रसंग गोष्टीच्या रुपाने बालमनावर बिंबविणे अपरिहार्य बनले आहे. आजच्या धावपळीच्या युगात कुटुंब, शाळा आणि महाविद्यालयातील युवकांसाठी संत साहित्यातील मूल्य शिक्षण अत्यंत उपयुक्त ठरत आहे, असे ते म्हणाले. सूत्रसंचालन लक्ष्मी फुटवाईक यांनी केले.

# खामगावात नायलॉन मांजा जप्त महिलेसह तिघे ताब्यात !

## पोलिसांनी शहरात राबविली शोधमोहीम...

जनसंचलन/ खामगाव

प्रतिबंधित नायलॉन मांजाची शहरात निर्मिती, साठवणूक आणि विक्री होत असल्याचे वास्तव समोर आल्यानंतर पोलिसांनी शनिवारी शहरातील मध्यवस्तीतील एका दुकानात छापा मारला. या कारवाईत सात हजारांचा घातक नायलॉन मांजा जप्त करण्यात आला.बुलढाणा जिल्ह्यातील सर्व घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी, साठवणुकदार यांना नायलॉन मांजाची विक्री व साठवणूक करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार नायलॉन मांजावर प्रतिबंधासाठी जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य नायलॉन मांजा बंदीसाठी पथक गठित; कारवाईला वेग नाही! संस्था व पोलिस विभाग यांनी स्वतंत्रीत्या पथके तयार करण्यात आली आहेत. दरम्यान, नायलॉन मांजाची अवैध विक्री करणारी संस्था अथवा व्यक्ती पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम १५ अन्वये शिक्षेस पात्र राहील, असे जिल्हा दंडाधिकारी यांच्या आदेशात नमूद आहे; मात्र तरीदेखील खामगाव शहरात मांजाची विक्री आणि साठवणूक होत असल्याचे वास्तव मध्यवस्तीतील



नायलॉन मांजा गुदामे उद्ध्वस्त करण्याचे आव्हान या मथळ्याखाली पोलिस प्रशासनाने शहरातील एका वस्तीत धाड टाकली. तिघांवर कारवाई केली. त्यांच्याकडून सात हजार रुपयांचा नायलॉन मांजा जप्त करण्यात आला.

# ५५ वाहनचालकांवर पोलिसांची कारवाई

जनसंचलन/ खामगाव

शहर व परिसरात दुचाकी चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने शहर पोलिसांनी शुक्रवारी वाहन तपासणी मोहीम सुरू केली. यावेळी ५५ बेशिस्त वाहनचालकांवर एकाचवेळी कारवाई करण्यात आली, तसेच वाहनांच्या कागदपत्रांची तपासणी केली. मागील दोन ते तीन वर्षांपासून सर्वत्र दुचाकी चोरीचे प्रमाण वाढले आहे. खामगाव शहर व परिसरात मागील काही दिवसांत अनेक दुचाकींची चोरी झाली आहे. या घटनांना आळा घालण्यासाठी शहरचे निरीक्षक



रामकृष्ण पवार यांच्या मार्गदर्शनात बसस्थानक परिसरात कारवाई करताना पोलिस कर्मचारी. शहरात वाहन तपासणी मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेचा भाग म्हणून शुक्रवारी बसस्टॅन्डच्या आवारात बेशिस्त वाहन लावणाऱ्या चालकांवरही कारवाई करण्यात आली. बसस्थानक, बसस्थानकाबाहेर असलेल्या ५५ पेक्षा अधिक चालकांवर कारवाई केली.

# चंद्रकांत बर्दे यांचा मराठी पत्रकार परिषदेच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी निवडी बद्दल मा.आमदार विजयराज शिंदे यांच्या हस्ते सत्कार

जनसंचलन/बुलढाणा

पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी झटणारी, राज्यातील पत्रकारांची मातृसंस्था, पत्रकारांची पहिली संघटना असणाऱ्या मराठी पत्रकार परिषदेच्या प्रदेश उपाध्यक्ष दैनिक विश्वविजेताचे संपादक, भाजपा जिल्हा सचिव श्री चंद्रकांतजी बरदे यांची नुकतीच निवड झाली आहे. या निवडी बद्दल दि.२८ डिसेंबर २०२४ रोजी भाजपा नेते मा.आमदार विजयराज शिंदे यांच्या जनसंपर्क कार्यालय शिवालय येथे त्यांचा भाजपा पदाधिकाऱ्यांनी मोठ्या आनंदात कौटुंबिक स्वागत सत्कार करण्यात आला. यावेळी विजयराज शिंदे यांनी श्री चंद्रकांतजी बरदे यांचा स्वागत सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी विजयराज शिंदे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. चंद्रकांत बरदे एक बहुआयामी व्यक्तिमत्व असून, पत्रकार बांधवांच्या न्याय हक्कासाठी झटणाऱ्या सर्वसामान्य कार्यकर्त्याचा



हा खरा सन्मान आहे त्यांच्या रूपाने पुन्हा एकदा बुलढाणा जिल्हाला हा बहुमान मिळाला आहे. अश्या भावना व्यक्त केल्या आहे. सत्कार मूर्ती चंद्रकांत बरदे यांनी यांनी सत्काराला उत्तर देताना भावनिक होऊन मिळालेल्या जबाबदारीचे सोने करून पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी या निवडीने नक्की बळ मिळाले असून पूर्ण क्षमतेने काम करण्याचे आश्वासन आपल्या मनोगतातून दिले. या कौटूंबिक सत्कार सोहळ्यास भाजपा कामगार मोर्चा प्रदेश सचिव विश्राम पवार, प्रदेश प्रतिनिधी श्री अण्णा पवार, भाजपा जिल्हा सचिव दत्ता पाटील,ऍड दशरथसिंग राजपूत, भाजपा महिला मोर्चा मा.जिल्हाध्यक्ष सौ सिंधुताई खेडेकर, सौ उषाताई पवार, सौ शोभाताई,भाजपा कामगार मोर्चा जिल्हाध्यक्ष दत्ता शिंदे, गणेश देहाडराय, तुकाराम राठोड, प्रशांत बोरसे, अकिल हाजी, शेख रशीद, युसूफ भाई,प्रदीप सोनटक्के, माजी नगरसेवक संजय अग्रवाल, संजय तोटे, पप्पू सोनकर, नारायण हेलगे,सतीश देहाडराय,यतीन पाठक,संजय जुंबड ई मान्यवर उपस्थित होते तर या कौटुंबिक सत्कार सोहळ्याचे सूत्रसंचालन भाजपा माजी शहराध्यक्ष श्री अनंता शिंदे यांनी केले.

# घरात घुसून गळ्यातील मंगळसूत्र लंपास

जनसंचलन/ खामगाव




एका महिलेच्या घरात घुसून चोरट्याने तिच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र लंपास केल्याची घटना स्थानिक सुटाळपुरा भागात घडली. याप्रकरणी तक्रारीवरून पोलिसांनी एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तक्रारीनुसार, सुटाळपुरा भागातील शांताबाई गजानन देवगिरीकर शुक्रवारी दुपारी घरी जेवण करीत होत्या. त्यावेळी छोटू राऊत नामक युवक त्यांच्या घरी आला. महिलेच्या पतीची विचारपूस करीत दरवाजात बसला. दरम्यान, त्या जेवण आटोपून उठल्यानंतर त्यांच्या गळ्यातील ७५ सोन्याचे मणी व २ मंगळसूत्र असलेली पोत हिसकावली. त्यांना धक्का देऊन पळून गेल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला. या तक्रारीवरून शिवाजी नगर पोलिस स्टेशनला तक्रार दिली असून त्यावरून पोलिसांनी छोटू राऊत याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०९ (६) ३३३ नुसार गुन्हा दाखल केला.




# मराठी पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्षपदी रणजीतसिंग राजपूत यांची निवड...

## सरचिटणीस कासिम शेख तर कार्याध्यक्षपदी प्रशांत देशमुख, वसीम शेख यांची नियुक्ती

जनसंचलन/बुलढाणा

मराठी पत्रकार परिषद संलग्नित बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्षपदी गुड इव्हिनिंग सिटीचे सर्वेसर्वा रणजीतसिंग राजपूत यांची अविरोध निवड करण्यात आली. तर सरचिटणीस कासिम शेख, कार्याध्यक्षपदी प्रशांत देशमुख व वसीम शेख, यांचीही सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली. २९ डिसेंबर रोजी बुलढाणा येथील पत्रकार भवनात पार पडलेल्या बैठकीत जिल्हा पत्रकार संघाची कार्यकारिणी गठीत करण्यात आली. या बैठकीत मराठी पत्रकार परिषदेच्या राज्य उपाध्यक्ष पदी चंद्रकांत बर्दे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर जिल्हाध्यक्ष पदाचा प्रस्ताव मांडण्यात आला. यावेळी सूचक म्हणून गजानन राऊत यांनी जिल्हाध्यक्ष पदासाठी रणजीतसिंग राजपूत यांचे नाव सुचवले. तेव्हा सर्वांनी एकमताने त्यांच्या नावाला पाठिंबा दर्शविला. मराठी पत्रकार परिषद संलग्नित बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्ष पदी रणजीतसिंग राजपूत, सरचिटणीस कासिम शेख, कार्याध्यक्ष प्रशांत देशमुख, वसिम शेख, चिटणीस यशवंत पिंगळे, महिला जिल्हाध्यक्ष मृणाल सोमनाथ सावळे, सोशल मिडीया प्रमुख संजय जाधव, उपाध्यक्ष संतोष लोखंडे यांची अविरोध निवड करण्यात आली आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ आणि समाजाचा आरसा असलेल्या पत्रकारांच्या हक्कासाठी मराठी पत्रकार परिषद लढा देत आहे. ८३ वर्षांचा इतिहास असलेली मराठी पत्रकार परिषद ही एकमेव जुनी संघटना आहे. या संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांची

### पत्रकार दिनानिमित्त आरोग्य शिबीराचे आयोजन

**पत्रकार दिनानिमित्त ६ जानेवारीला पत्रकार भवन बुलढाणा येथे सर्व पत्रकारांसाठी आरोग्य शिबीर आयोजित करण्यात येणार आहे. यावेळी अॅलोपॅथी, होमिओपॅथी व आयुर्वेद क्षेत्रातील तज्ञ डॉक्टरांची उपस्थिती राहणार आहे. यामध्ये आरोग्याची तपासणी करण्यात येणार आहे. ६ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता शिबीराला सुरूवात होणार आहे. तरी सर्व पत्रकारांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.**

एकजूट दिसून येते. जगाच्या पाठीवर पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी लढणार्या अनेक संघटना असतील, मात्र सुरुवातीपासून मराठी पत्रकार संघ अतिशय पारदर्शकपणे व प्रामाणिकपणे पत्रकारांच्या प्रश्नांना वाचा फोडत आहे. नुकतेच ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र काळे यांचा कार्यकाळ संपल्याने मराठी पत्रकार परिषदेच्या राज्य उपाध्यक्षपदी चंद्रकांत बर्दे यांची निवड झाली. जिल्हा पत्रकार संघाची कार्यकारणी गेल्या अनेक दिवसांपासून रखडली होती. दरम्यान, रविवारी पत्रकार भवन येथे यासंदर्भात बैठक झाली. याप्रसंगी अधिस्विकृतीधारक पत्रकार समितीचे विभागीय सदस्य राजेंद्र काळे, मराठी पत्रकार परिषदेचे उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे, डिजीटल मिडीया परिषदचे राज्य उपाध्यक्ष अनिल उंबरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. रणजीतसिंग राजपूत गेल्या २४ वर्षांपासून पत्रकारिता करीत आहे. निर्भीड, निपक्ष





पत्रकारितेसाठी ते जिल्ह्यात प्रसिद्ध असून, त्यांनी स्वकर्तृत्वातून जिल्ह्याचा नावलौकिक उंचावला आहे. त्यांचे निवडीचे विविध स्तरातून कौतुक होत आहे. पत्रकार भवनासमोर फटाक्यांची अतिषबाजी करून नवनियुक्त पदाधिकार्यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या बैठकीला जिल्ह्यातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे
दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958